**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन) प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त संपरीक्षा केलेला २०२२ चा अविलंबित खटला क्रमांक १०३ याचा अभिलेख.</u>**

सौ. मीना वा. जाधव, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाली, जिल्हा रायगड यांचे न्यायालयात.

| | | |
|---|---|---|
| ०१. अपराध घडल्याचा दिनांक | :: | १५.०७.२०२२. |
| ०२. फिर्याद दाखल केल्याचा दिनांक | :: | २२.०७.२०२२. |
| ०३. फिर्यादीचे नाव, वय व संपूर्ण पत्ता | :: | **श्री. जगन्नाथ मोरेश्वर पवार,** वय ४८ वर्षे, व्यवसाय – व्यापार, रा. जांभूळपाडा, ता. सुधागड, जिल्हा रायगड. |
| ०४. आरोपीचे नाव, वय व संपूर्ण पत्ता | :: | **श्री. ताराचंद गंगाराम राठोड,** वय ४३ वर्षे, व्यवसाय – व्यापार, रा. जांभूळपाडा, ता. सुधागड, जिल्हा रायगड. |

०५. अपराधाचा तपशिलः–

तुम्ही फिर्यादी यांचेकडुन तुमच्या आर्थिक अडचणीपोटी रक्कम रुपये १,५०,०००/– घेतली होती ती रक्कम त्यांना देणे होतात. तुम्ही त्याकरीता दि.२३/०६/२०२२ रोजी रक्कम रुपये १,५०,०००/– चा धनादेश क्र.००००००७ तुमचे एच.डी.एफ.सी.बँक, शाखा पाली–सुधागड या बँकेतील धनादेश फिर्यादीस दिला. फिर्यादीने सदर धनादेश बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा जांभूळपाडा, ता.सुधागड येथे असलेल्या त्यांच्या खात्यात जमा केले असता, '***अपर्याप्त निधी***' (Insufficient Funds) असा शेरा मारुन दि.०६/०७/२०२२ रोजी बँकेने रिटर्न मेमोसह परत दिला.

फिर्यादीने तुम्हाला दि.१५/०७/२०२२ रोजी वकिलामार्फत नोटीस देवून धनादेशावर नमूद असलेली रक्कम त्यांना देण्याबाबत कळविले. ती नोटीस तुम्ही

दि.२२/०७/२०२२ रोजी मिळाली. तरीसुध्दा तुम्ही मागणी नोटीस प्रमाणे धनादेशावरील नमूद रक्कम फिर्यादीस पंधरा दिवसात परत दिली नाहीत, त्यायोगे तुम्ही पराक्रम्य अभिलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ अन्वये गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा माझे स्थळसिमेत घडलेला आहे.

ठिकाणः पाली. ( मीना वा. जाधव )
दिनांकः ०२/०१/२०२३. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाली.

**आरोपीचे प्रतिकथनः**

प्रश्न क्र.०१ – तुम्हाला फिर्यादीच्या नक्कला मिळाल्या आहेत काय ?
उत्तर – **होय.**
प्रश्न क्र.०२ – तुम्हाला आता तुमच्या विरुध्दचा आरोपाचा तपशिल मातृभाषेमध्ये वाचून दाखविला, तो तुम्हाला समजला आहे काय ?
उत्तर – **होय.**
प्रश्न क्र.०३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर – **नाही, मला गुन्हा कबूल नाही.**

------------------ समक्ष,
(आरोपीची स्वाक्षरी)

स्वाक्षरी/–
ठिकाणः पाली. ( मीना वा. जाधव )
दिनांकः ०२/०१/२०२३. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाली.